**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर नामनिर्देशनाने नियुक्ती करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कृपमं-०९२२/प्र.क्र.४९१/२१स,**
मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक: १५ मे, २०२६.

**वाचा-** १. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३.
२. शासन निर्णय क्र.कृपमं-०९२२/प्र.क्र.४९१/२१स, दि.१७.५.२०२३.
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.कृपमं/प्रशासन/ठाकूर-सदस्य/९८५/२०२६ दि.३०.०४.२०२६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ३९(ब) मध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर राज्यातील बाजार समित्यांच्या सभापती मधून प्रत्येक महसूल विभागातून एक सदस्य या प्रमाणे ६ सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याची तरतूद आहे. नागपूर महसूली विभागातून कृषि उत्पन्न बाजार समिती, काटोल, जि.नागपूर या बाजार समितीचे सभापती श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर यांची महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर नामनिर्देशित सदस्य म्हणून संदर्भ क्र.२ येथील दि.१७.५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती.

श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर यांचा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावरील नामनिर्देशित सदस्यत्वाचा कार्यकाल दि.१६.५.२०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांची महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर नागपूर महसूली विभागातून नामनिर्देशित सदस्य म्हणून पुनश्चच: नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर, सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, काटोल, जि.नागपूर यांची महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ३९(ब) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर सदस्य म्हणून नागपूर महसूली विभागातून दि.१७.०५.२०२६ पासून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर हे दि.१७.०५.२०२६ पासून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावर सदस्य म्हणून कामकाज पाहण्यास पात्र असतील.

३. श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर यांचा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळावरील सदस्य पदाचा कालावधी कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३९ (ब) मधील तरतुदीनुसार राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१५१५१७५७६२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAVI SANDEEP SHINDE

Digitally signed by MADHAVI SANDEEP SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=020531E249E88FE74BF6DB805F42944E7F29BC0BA6134C83C1F183B8CC27F2FF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4CB1CBBD6A4EE442FDAA6C1B358BF61FEAF9AEFC16E8F39E9EE1D06B9E8A7A59, cn=MADHAVI SANDEEP SHINDE
Date: 2026.05.15 15:18:57 +05'30'

**( माधवी शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.
४. श्री.चरणसिंग बाबुलालजी ठाकूर, सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, काटोल, जि.नागपूर.
५. निवडनस्ती (२१-स).